

पब्लिक सोल ट्रस्ट नं.ए-१३९१



# श्री स्वामी जगद्गुरु शंकराचार्य पीठ करवीर

२२९९, 'डी' वार्ड, शुक्रवार पेठ, कोल्हापूर-४१६ ००२. दूरध्वनी : ०२३१-२५४१४५४.
E-mail : peethkarvir@gmail.com

(एकमेव)
**पूर्ण विश्वस्त**
श्री प.प.विद्यानृसिंह भारती स्वामी
विद्यमान जगद्गुरु शंकराचार्य

"नंदन" १९३४
मार्गशीर्ष कृ. ७ शुक्रवार
४-१-२०१३

श्री. बबनराव पाटील
१ वैष्णव निवास, आकुर्ली क्रॉस रोड नं. २, कांदिवली (पू) मुंबई.

पीठस्थ देवतेंचे उत्तम आशीर्वाद व आमचे नारायण-स्मरण.

"वास्तू तोडगे" पाहिले. संकलन अती छान व कष्टपूर्वक केलेले जाणवते. त्यामुळे तोंडभर कौतुक करावेसे वाटते.

ग्रीष्म ऋतूत तहानलेल्या हरणाला तृष्णा शमनासाठी मृगजळामागे धावून जीव गमवावा लागतो तसेच व्यवहारात पदोपदी येणाऱ्या अडचणीतून मार्ग काढताना जीव मेटाकुटीस येतो. व मग कशामुळे असे घडले? हा प्रश्न उभा राहतो. व नंतर त्यावर उपाय शोधायला सुरवात होते.

असो. प्रत्येकाने एक लक्षात ठेवावे की "अवश्यमेव भोक्तव्यम् कृतं कर्म शुभाशुभम्॥ मानव व्यावहारिक सुखासाठी धडपडतो पण सुखप्राप्तीचे कारण पुण्य ते करत नाही. उलट मानवाला दुःख नको असते. पण दुःख ज्याचे फळ आहे ते अधर्माचरण मात्र सतत करत असतो. जर प्रत्येक जण धर्मा--चरण करू लागला तर अशा अडचणी येणार नाहीत व आयुष्याच्या दृष्टीने प्रगती साधेल.

असो. सोबत तोडग्यांवरील टिपणी जोडली आहे.

पुनश्च एकदा पीठस्थ देवतेंचे अनेक आशीर्वाद व आमचे नारायण-स्मरण सविस्तर विदीत व्हावे.

महानुशासनम् वरीवार्ति
श्री. जगद्गुरु शंकराचार्य,
करवीर पीठ, कोल्हापूर